# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१७/१०/२०१८
## दि.१६/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २०५/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | भगवान डिकले,वय-४० वर्षे,रा.शिवाजीनगर,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१०/२०१८ रोजी २०/३० वा.सिध्देशिला हाऊसचे पाठीमागील सार्वजनिक रोडचे बाजुने भांडारकर रोड गल्ली नं.७,रसिक लॉज शेजारी डेक्कन,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे रहाते घरी मोबाईलवर बोलत पायी चालत जात असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ पाठीमागुन येवुन,फिर्यादी यांचे १६,९००/- रू किचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावुन चोरून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मिलिंद कांबळे ९७६५३९१२४० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ११७७/१८,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | प्रबिर पाल,वय-६४ वर्षे,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०८/२०१८ ते दि.१४/०९/२०१८ रोजीचे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी टॉवर नं ९/१७०२,ॲमनोरा टाऊनशिप हडपसर पुणे येथील बेडरुम मधील कपाटातुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील फिर्यादी यांची पत्नी व बहीण यांचेकडील सोन्याचे व डायमंडचे दागिने ४,२०,०००/- रु किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. डी.डी.गाडे ८८८८७९९६९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६६५/१८,भादविक ४५२,३४१,३२३,५०४,५०६,१४३,१४७,१४९,सह महा.पो.का. १९५१ चे क.३७(१) सह १३५,महा.प्रोव्हि. ऑफ रॅगिंग ॲक्ट १९९९ चे सह क.४ |
| **फिर्यादी** | एक विद्यार्थी,वय-१९ वर्षे,धंदा-शिक्षण,रा.येवलेवाडी,पुणे |
| **आरोपी** | १.एक विद्यार्थी,वय-१९ २.एक विद्यार्थी,वय-१९ ३.एक विद्यार्थी,वय-२१ ४.एक विद्यार्थी,वय-१९ व दोन विधीसंघर्षीत बालक,सर्व रा.एक नामांकीत इंजिनिअरींग कॉलेज कॉलेज हॉस्टेल, पुणे (ताब्यात) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/१०/२०१८ रोजी पहाटे ०१/३० वा.चे दरम्यान एक नामांकीत इंजिनिअरींग कॉलेज हॉस्टेल, येवलेवाडी,ता.हवेली पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व यातील नमुद विद्यार्थी हे एका नामांकीत इंजिनिअरींग कॉलेज हॉस्टेल, येवलेवाडी,ता.हवेली पुणे येथे शिकण्यास असुन,फिर्यादी हे हॉस्टेलच्या रुम मध्ये झोपले असताना,त्यांचे कॉलेज मध्ये शिकणारे व कॉलेजच्या हॉस्टेलवर राहणारे त्यांचे ओळखीचे विद्यार्थी यांनी बळजबरीने फिर्यादी यांचे रूम मध्ये येवुन,त्यांचे मित्रास झालेल्या मारहाणीबाबत विचारपुस करून तुझ्या घरी कळव,तसेच कॉलेज मधील हॉस्टेल रेक्टर व प्राचार्य यांना सांग असा सल्ला दिल्याचे कारणावरून,त्याचा राग मनात धरुन त्यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून त्यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून,“तु पुण्यामध्ये कसा राहतो,तुला संपवून टाकतो,तुला येथुन सोडत नाही अशी धमकी देवुन”, फिर्यादीस रुम बाहेर जावु न देता,त्यांचे डोक्यात आरसा फोडुन,डोळयावर हाताने मारहाण करून जखमी करून,सर्वांनी फिर्यादी यांना यापुढे भाई म्हणुन नमस्कार करायचा अशी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.काळे ८८८८१८१७७७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ४२६/१८,भादविक ४०८ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय- ५०,रा.मुंकुंदनगर,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०८/२०१८ रोजी सुजय गार्डन,कमर्शिअल कॉम्प्लेक्स,मुंकुंदनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा डायमंड ज्वेलरी बनविण्याचा व्यवसाय असुन,यातील नमुद इसम हे फिर्यादी यांचे ऑफीस चालु केलेपासुन त्यांचेकडे मार्केटींगचे काम पाहतात. त्यामध्ये हिरे व हिरेजडीत ज्वेलरी विकणे व त्याचे देवाण-घेवाणीचे व्यवहार ते पहात होते. त्यासाठी ते पुर्ण महाराष्ट्र तसेच गुजराथ व मध्य प्रदेश येथे मार्केटिंगसाठी जात होते. फिर्यादी यांनी त्यांचेकडे विश्वासाने रोख रक्कम व हि-याचे दागिने असा एकुण ३९,५५,०००/- किंचा ऐवज जोखीम स्वरुपात ठेवण्यासाठी दिले असताना,सदर इसमाने फिर्यादीस त्यांचे दागिने परत न देता सदर दागिन्यांचा अपहार केला आहे. (सदर इसमाने फिर्यादी यांचे दागिन्याचे अपहार केलेली रक्कम देणार असल्याचे कबुल केले होते. परंतु त्यांनी आजपर्यंत सदरची रक्कम परत न कल्याने,त्यांनी स्वारगेट पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.बी.जगदाळे ९६५७९२७९२७ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २०६/१८,भादविक ३५३,२७९,मो.वा.अधि.१८४,२३९, १३०/१७७ |
| **फिर्यादी** | मनिषा वायसे, महीला पोलीस नाईक, डेक्कन वाहतुक विभाग,पुणे |
| **आरोपी** | अक्षय जयसिंग जाधव,वय-२५ वर्षे,रा.६३८/१,निलसागर सोसायटी,बिबवेवाडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/१०/२०१८ रोजी २०/०५ वा. गुडलक चौक,डेक्कन,पुणे येथील सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया गुडलक चौक डेक्कन पुणे येथे सहकारी पोलीस हवा.उकंरडे यांचेसमवेत वाहतुक नियमन करून त्यांचे सरकारी कर्तव्य बजावित असताना, यातील नमुद इसमाने त्याचे मोटार सायकलवरुन येवुन,नमुद ठिकाणी असलेला सिग्नल जम्प करुन हयगयीने भरधाव वेगाने वाहन चालवुन,फिर्यादी यांचे अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला. तसेच फिर्यादी हे सदर इसमास वाहतुक नियमांबाबत सांगत असताना,त्याने विनाकारण फिर्यादी यांचेशी हुज्जत घालुन ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.आर.काटे ९९२३३६०९६६ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६६४/१८,भादविक ३५३,३४ मोव्हे.ॲक्ट क.४(१),१८१,१७९,२५०(अ),१७७ |
| **फिर्यादी** | चंद्रभान संकपाळ, पो.हवा. कोंढवा वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/१०/२०१८ रोजी दुपारी १३/०० वा. शितल पेट्रोल पंप ते मोर मॉलचे दरम्यान रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी शितल पेट्रोल पंप ते मोर मॉलचे दरम्यान त्यांचे सरकारी वाहतुक नियमनाचे कर्तव्यावर हजर असताना,यातील नमुद इसमापैकी एक इसम हा मोबाईल वर बोलत गाडी चालवत असताना,फिर्यादी यांनी त्यास थांबवुन त्याचेकडे कागद पत्राची मागणी केली असता,त्याने उडवा-उडवीची उत्तरे देवुन,त्याचे मित्रांना सदर ठिकाणी बोलावुन घेवुन,फिर्यादी यांना दमदाटी करून त्यांचेबरोबर झटापटी करून,ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.व्हि.वाडकर ९९२३२४१५२१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**